MHSO130000061978

## निशाणी क्र. ६८४ वरील आदेश

वादी ने सदरचा अर्ज मयत प्रतिवादी क्र.८क व प्रतिवादी क्र.८इ चे वारस रेकॉर्डवर घेऊन दुरुस्ती करणेकामी परवानगी मिळणेकरीता दिला आहे. दाव्याचे कामकाज चालू असताना प्रतिवादी नं.८क राजेंद्र पर्वत माने हे दिनांक १८/०७/२०१५ रोजी बार्शी येथे व प्रतिवादी नं.८इ गजानन पर्वत माने हे दिनांक ०१/०६/२०१९ रोजी बार्शी येथे मयत झाले आहेत. त्यामुळे मयत प्रतिवादींचे वारस रेकॉर्डवर घेवून दाव्याचे काम पुढे चालणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. म्हणुन अर्ज मंजुर होण्याची विनंती केली. सदर अर्जास प्रतिवादींनी म्हणणे दिले नाही.

२. अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीस ऐकले. वादीने सदरचा दावा हा सरस निरस मानाने वाटप होउन मिळणेकरिता व पृथक कब्जा मिळणेकरिता दाखल केला आहे. वादीने सदर प्रतिवादी नं.८क व प्रतिवादी नं.८इ यांचा मृत्यु झाला असल्याबाबत त्यांचे मृत्युचे दाखले निशाणी क्र.६८२ च्या यादीसोबत जोडलेले आहेत. त्यांची पाहणी केली असता त्यावर प्रतिवादी नं.८क राजेंद्र पर्वत माने हे दिनांक १८/०७/२०१५ रोजी बार्शी येथे व प्रतिवादी नं.८इ गजानन पर्वत माने हे दिनांक ०१/०६/२०१९ रोजी बार्शी येथे मयत झाले असल्याचे दिसून येते. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र.८क व प्रतिवादी क्र.८इ च्या वारसांना दावा चालविण्याचा अधिकार जिवंत राहतो. त्यामुळे वादीचा सदरचा निशाणी क्र.६८४ चा अर्ज खर्चासह मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, वादीचा अर्ज निशाणी क्र.६८४ रु.३००/- च्या खर्चासह मंजूर करण्यात येतो, वादीला असे सुचित करण्यात येते की त्यांनी आवश्यक ती दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत दाव्याचे कामी दाखल करावी. दावा दुरुस्ती झाल्यानंतर प्रतिवादी क्र.८क व प्रतिवादी क्र.८इ चे वारसांना मुद्दे निश्चितीसाठी व कैफीयत देणेसाठी दाव्याचे समन्स काढावे.

Digitally signed by Santosh Bholaram Vijaykar
Date: 2023.10.19 17:25:32 +0530

बार्शी
दिनांक १९/१०/२०२३.

(एस.बी. विजयकर)
सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S.R. Barangule |
| (b) | Court | : | S.B. Vijaykar,<br>Jt.C.J.J.D.&J.M.F.C.<br>Barshi. |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 19/10/2023 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 19/10/2023 |